.. astaachala ..

# ॥ अस्ताचल ॥

सूर्य अस्तगिरिवरती, क्षितिजावर रंग गूढ,
वृक्षांसह पक्ष्यांसह वाराही मौनमूढ!
क्षण सरतिल चारदोन, नंतर अंधार मात्र,
सूर्यासह बुडणारच माझे अस्तित्वपात्र!

मावळत्या रंगस्छटा पूर्वेवर उमटतात,
अस्तांचलिं असता मी पूर्वस्मृति प्रकटतात!
अक्षय ते पाथेयच अंतिम मम यात्रेस्तव
दिवस नवा आल्यावर जननान्तर स्मृतिवैभव!

एक एक बीजातुन एक एक गीत नवे,
मरणातहि उरणारा तूच भाग्यवंत, कवे!

राजसी, वसन्त बापट

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated October 4, 1999